# स्त्री-मुक्ती आघाडी नागपूर

## संघटन, उद्घाटन, आव्हान व कार्य

नागपूरच्या दिक्षाभूमीवर, ६ ऑक्टोबर ८१ रोजी, रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. चार सहा दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. अन् त्यानंतर प्रत्येक वस्त्या-वस्त्यातून रौप्य महोत्सवाचे कार्यक्रम व्हायला लागलेत. कुठे अध्यक्ष, कुठे उद्घाटक, तर कुठे वक्ता म्हणून जायचा योग मला आला. ह्या सर्व ठिकाणच्या कार्यक्रमांना पुरुषांपेक्षा स्त्रियांचीच उपस्थिती अधिक दिसायची. कृष्णनगर ले आऊट बॅनर्जी ले आऊट, भीम नगर, जयभीम नगर, चंद्रमणी नगर, अयोध्या नगर, इ. बौद्ध व मागासवर्गीयांच्या वस्तीत हे कार्यक्रम होत असल्यामुळे त्यांनाही स्टेजवर येऊन बोलायची संधी मी देत गेले अन् झालं काय ? या महिला अशिक्षित असूनही त्यांच्या सुशिक्षित अन् जागृत विचाराने मी भारावून गेले. जीवनाला सामोरे जाण्यासाठी करावयाचा संघर्ष, तो संघर्ष पेलून धरण्याची, अन्यायाविरुद्ध बंड करण्याची त्यांची ताकद, त्यांच्या अडाणी बोलीतून शब्दातून साकारलेली पाहिली. भाषणानंतर छोटयाशा कविसंमेलनात भाग घेणारी नवी तरुण मुलेमुली, ज्यांच्या कवितेत विचार, तत्वज्ञान व समाज प्रबोधन आहे. अन्याय करु होतो ह्याचेच केवळ चित्रण नाही तर तो लढा देवून कसा दूर केला पाहिजे याचाही महामंत्र कवितेत आहे अशा कवि कवियत्रींना विचारले. तुम्ही कुठल्या संस्थांच्या मेंबर का होत नाहीत ? कुठे कविता का पाठवित नाहीत ? त्यांनी दिलेले उत्तर मोठे विचारप्रवर्तक अन् मजेदार : ' आमच्या कविता ऐकून घ्यायला किंवा आम्हाला संधी द्यायला असं कुठलं व्यासपीठ आहे का ? बाई असं करा ना, आम्ही इकडच्या सर्व महिला मंडळाच्या बाया आणि पोरपोरी जमवतो. तुम्ही अशी एखादी संघटनाच निर्माण करा, ज्यात आमच्या कला गुणाना वाव मिळेल व अन्यायाविरुद्ध दाद मागायला. तसेच स्त्रियांचे मानसिक बळ वाढवून समाजातील सर्व थरांमध्ये एकता नांदावी, स्त्रियांचे प्रश्न सोडवावयास स्त्रियाच समर्थ कराव्यात, यासाठी आपण ' स्त्री-मुक्ती आघाडी 'ची उभारणी करू ! माझ्या उत्तराची वाट न पाहता त्या मुलींनी व बायांनी संघटनेचं नावही सुचवून टाकलं त्या साऱ्यांचं नेतृत्व करणाऱ्या डॉ. शांताबाई गवई होत्याच पुढच्याच आठवडयात मिटिंग बोलावून ' स्त्री-मुक्ती आघाडी 'ची कार्यकारिणी ठरविली ती सर्वानुमतेच.

म. फुल्यांची पुण्यतिथी दिनांक २८ नोव्हेंबर रोजी स्त्री मुक्ती आघाडीची स्थापना करून म. फुल्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वाहिली.

स्त्री स्वातंत्र्याची चळवळ म. फुल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गतिमान केली. डॉ. बाबासाहेबांच्या क्रांतिकार्याने दलित स्त्रीची अस्मिता जागी झाली ताठ मानेने उभे राहण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी आहे.

' शिका, संघर्ष करा-संघटीत व्हा ' हे ब्रीदवाक्य आपल्या मनाच्या सांदीकोपऱ्यात जपून ठेवून महाराष्ट्रातील बौद्ध मागास समाजातील ज्ञात व अज्ञात लेखक लेखिका, कवियत्री, कलावंत स्त्रियांना प्रोत्साहन देऊन कलागुणांची जोपासना करणारे कार्यक्रम होणे हा प्रधान हेतू. तसेच सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतीक कार्यक्रम आखणे व ते अंमलात आणणे, महिला मेळावे घेणे, स्त्रियांना मार्गदर्शनाचा लाभ मिळवून देणे इ. कार्यक्रमाचे उद्देश घेऊनच जन्माला आलेली ही संस्था.

५।१२।८१ रोजी स्त्री मुक्ती आघाडीचे उद्घाटन श्रीमती आ. कुसुमताई अभ्यंकर यांच्या हस्ते झाले अध्यक्षस्थानी प्रा. विशाखाताई वडस्कर होत्या. तर

(पान क्र. ४५ वर पहा)